नि.दि.दावा क्र.११२/२००९
उमेश वि. किशनलाल.

**<u>नि.क्र.१ वरील आदेश</u>**

१. प्रस्तुतचा दावा हा वादीने वाटपाकरीता, कब्जाकरीता व कायम मनाईकरीता दाखल केला आहे. दावेकामी अदयाप प्रतिवादी क्र. ४, ५, ६, १०, ११, १२, १५, १९, २२, २३, २४, २५, २९ व ३१ यांना समन्स लागु होणे बाकी आहे. वादीच्या अर्जानुसार वेळोवेळी प्रतिवादींना वेगवेगळया माध्यमांमार्फत समन्स पाठविण्यात आले. परंतु त्याचा अदयापपर्यंत अहवाल न्यायालयास प्राप्त झाला नाही. वादीतर्फे विधीज्ञांना दि.२५.०७.२०२४ रोजी नि.क्र.११३ कडे वरील सर्व प्रतिवादींना रजीस्टर पोस्टाने समन्स पाठविणेबाबतचा अर्ज दाखल केला. तो अर्ज त्याच दिवशी रजीस्टर पोस्टाची प्रोसेस लावण्याच्या अटीवर मंजुर करण्यात आला. त्यानंतर प्रस्तुत प्रकरणात दि.०९.०८.२०२४, ३०.०८.२०२४ व १०.०९.२०२४ अशा तीन तारखा प्रोसेस लावण्याकरीता ठेवण्यात आल्या परंतु वादीने हजर राहुन नि.११३ वरील आदेशाची पुर्तता केली नाही.

२. सदरील प्रकरण हे आ.उच्च न्यायालय मुंबई यांच्या आदेशान्वये लक्षीत केलेले प्रकरण असुन ते लवकरात लवकर चालविण्यात यावे अशा सुचना आ.न्यायालयाकडुन वेळोवेळी प्राप्त झालेल्या आहेत. वादीने वारंवार

संधी देवुनही नि.११३ वरील आदेशाची पुर्तता केली नसल्यामुळे वादीचा दावा प्रतिवादी क्र. ४, ५, ६, १०, ११, १२, १५, १९, २२, २३, २४, २५, २९ व ३१ यांचे विरुद्ध दि.प्र.सं.आदेश ९ नियम ५ अंतर्गत काढुन टाकण्यात येतो.

Digitally signed by URMILA PARASHRAM KOLI
Date: 2024.09.27 15:52:24 +0530

दि.२७.०९.२०२४

(श्रीमती.यु.पी.कोळी)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
बदनापूर.